# डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
# जिल्हा परिषद रत्नागिरी
## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र, ग्रामपंचायत विभाग

email id - rtnmregs@gmail.com दुरध्वनीक्र. 02352-222002

**महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोहयो), शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-2020/ प्र.क्र.97/रोहयो-10अ दि.13 जानेवारी 2021 अन्वये म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये CSO/FPO/CBO/NGO ची**

# अखर्चिक भागीदार निवडीसाठी जाहिरात

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत NGO च्या भागीदारीने माहिती, प्रशिक्षण व संवाद, तांत्रिक सहाय्य, सामुदायिक मालकी, आपत्ती व्यवस्थापन इ.बाबी करण्याच्या अनुषंगाने तसेच या योजनेअंतर्गत मजुरांना कौशल्य तसेच नियोजन प्रशिक्षण देणे तसेच ग्रामपंचायतींना आपत्ती व संकट व्यवस्थापनात स्वावलंबी होण्यासाठी मदत होण्याच्या दृष्टीने उपरोक्त शासन निर्णयातील अ.क्र.6(ब) नुसार अखर्चिक भागीदार निवडीसाठी नोंदणीकृत अशासकीय स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

अखर्चिक भागीदार निवडीसाठी नोंदणीकृत अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या निवडीचे उपरोक्त शासन निर्णयातील अ.क्र.6(अ) नुसार खालीलप्रमाणे निकष आहेत.

1. विना आर्थिक सहाय्याचे काम करण्याची तयारी असावी.
2. शासकीय क्षेत्रात काम करण्याचा अनुभव असावा.
3. जलसंधारण किंवा सामुदायिक विकासाचे नियोजन क्षेत्रात काम करण्याचा अनुभव असणा-यांना प्राधान्य.
4. स्वयंसेवी संस्थाचे प्रशासकीय संघटन आवश्यक त्या जिल्हयात असावे.
5. स्वयंसेवी संस्था निती आयोगाच्या NGO PS Portal वर नोंदणीकृत असावी.

वरीलप्रमाणे पात्र संस्थांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक 08.05.2026 पर्यंत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कक्ष, जिल्हा परिषद रत्नागिरी कार्यालयाकडे समक्ष अर्ज सादर करावेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**
**तथा**
**सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक**
**मगांराग्रारोहयो-महाराष्ट्र, जि.प.रत्नागिरी**

जा.क्र.रजिप/ग्रा.पं./मग्रारोहयो/ 330 /2026
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कक्ष,
जिल्हा परिषद रत्नागिरी.
दिनांक :- 27.04.2026.